# गेवराईत वाळू तस्करीतून तहसीलदार मालामाल हप्तेखोरीतून त्यांची नवीचाल?


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २६५ ■ शुक्रवार दि.१३ जून २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 265 ■ Friday Dt.123 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4




# अवैध वाळू उपशामुळे शासनाचा करोडो रुपयांचा महसूल पाण्यात तरीही तहसीलदारांची बदली होत नाही मग तहसीलदार संदीप खोमणे महसूल प्रशासनाचे जावई आहेत का?

## तहसीलदार हप्त्यांच्या वेगाने वाळू तस्करांना बळ देत असतील तर शासनाचा महसूल बुडवण्याचे पाप देखील त्यांच्या हातून घडतंय असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही?

## दत्त नगरीच्या परिसरात सर्रास चालतो व्यवहार; वाळू तस्करांकडून हप्ते वसूल करणारा कोण तो आक्का?

## रात्रभर जागे असणारे तहसीलदार कार्यालयात उशिरा येऊन नेमकं काय करतायत?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई येथील महसूल अधिकारी व कर्मचार्यांच्या नाकावर टिच्चून वाळू तस्करी बिनबोभाट सुरु असुन गेवराई तालुक्यात महसुल विभागाच्या नाकावर टिचून वाळूची चोरी बिनबोभाटपणे सुरु आहे. वाळू चोरी मुळे शासनाचा महसुल बुडत आहे. कोणताही वाळु लिलाव झाला नसतांना वाळू येते कुठून हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. शासनाकडुन जनतेला कमी दरात वाळू देण्याची घोषणा हवेत विरत चालली आहे. त्यामुळे गेवराई तालुक्यात गोदावरी पात्रात वाळू तस्करीने कळस गाठला असल्याचे निदर्शनात येत आहे. या प्रकारात अनेक दिवसापासुन बेसुमार वाढ झाली असून, रात्री बेरात्री बिनबोभाटपणे अवैध वाळूची तस्करी केल्या जात आहे. गावामध्ये अव्वाच्या सव्वा दराने वाळू विक्री करुन वाळु माफीया गब्बर झाले आहेत. येथील महसुल विभाग मुग गिळुन चुपचाप आहे. याबाबत तहसीलदारांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. तसेच शहरातील दत्त नगरीच्या परिसरात बसून चालतो पैशाचा ताल? अशी चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे. म्हणून तरच या प्रकारावर आळा बसेल की नाही याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शासनाचा महसुलचा बुडवण्याचा टक्का अशा कारभारामुळे वाढत असल्याची चर्चा आहे.

एकाही महसुल कमचार्यांच्या हाती अवैध वाळू वाहतुकीची वाहने नजरेस पडत नाही. ही आश्चर्यकारक बाब असल्याचे समोर येते अवैध वाहतुक करणार्या वाळु वाहनांचा वाहतुकीचा वेग हा भयंकर असल्याने अनेकदा सर्वसामान्यांना रहदारीला मोठा आडथळा निर्माण होतो. विशेष म्हणजे, वाळू वाहतूक करणार्या ट्रॅटरांचे नंबर प्लेट बदलल्या जातात कींवा अंधूक केल्या जातात. वाळू तस्करी व ओव्हरलोड वाहतुकीमुळे संगम जळगाव राक्षसभुवन, इतर ग्रामीण भागातील व परिसरातील चांगल्या रस्त्यांची पुरती वाट लागली आहे. वाळू तस्करी जोमात असताना महसूल विभाग यंत्रणा कोमात गेल्याने तस्करांना आळा घालणारा तरी कोण? असा प्रश्न सामान्य जनतेला पडला आहे. अवैध वाळूच्या ओव्हरलोड ट्रॅटरमुळे गेवराई तालुयातील गोदावरी पात्रातील रस्ते खड्ड्यात गेले आहेत. वाळूमाफिया अनेकदा अधिकार्यांवरही हल्ले करतात. यामुळे बीड जिल्ह्यात वाळूमाफियांची दहशत आहे. महसूल व खुद्द तहसीलदार वाळू माफियांच्या हप्ते खोरीमुळे मिंदे असल्याची चर्चा वाळू माफिया करत असल्याची प्रार्थमिक माहिती मिळत आहे. तहसीलदार महसूल विभागातील कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून हप्त्यांच्या वेगाने वाळू तस्कर यांना बळ देत असतील तर शासनाचा महसूल बुडवण्याचे पाप देखील त्यांच्या हातून घडतंय असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही. कारण दत्त नगरीच्या घरा लक्ष्मी पावेल का? जरा या ब्रीद वाक्य प्रमाणे रात्रीचा खेळ चाले रात्रभर तहसील कार्यालय सुरूच आहे. म्हणून तर माफीयांची गुंडागर्दी वाढलीकोणाचाच वचक नसल्याचे पाहावयास मिळत आहे.

महसुल विभागाचे अधिकारी तहसीलदार, अधिकारी फक्त आणि फक्त पगारापुरतेच काम करतात. अधिकार्यांच्या नाकर्तेपणामुळे वाळु तस्कराचे चांगलेच फोफावले आहे. जिल्हाधिकारी सुद्धा तालुकास्तरावरील अधिकार्यांच्या दैनदिन कामकाजावर डोळेझाक करतात. त्या मुळे शासनाचा महसुल बुडत आहे. वाळु विक्रेत्यांनी वाळु दर गगनाला भिडवल्याने घरांचे बांधकाम करणे जिकरीचे झाले आहे. वरिष्ठ अधिकारी लक्ष देतील का? हा प्रश्न निर्माण होत आहे.



## गावठी कट्टा, पिस्टल बाळगणारा इसम स्था.गु.शा.बीड ने केला जेरबंद

बीड । प्रतिनिधी

मा. पोलीस अधीक्षक, साहेब, बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखा, बीड येथील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना अवैधरित्या गावठी पिस्टल बाळगणारे इसमानविरुद्ध कारवाई करणेबाबत आदेशीत केले होते. त्यावरून दि. १२/०६/२०२५ रोजी पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांना माहिती मिळाली की, एक इसम नामे जुबेर सय्यद हा त्याचे कमरेला गावठी कट्टा लावून शाहूनगर येथील हनुमान मंदिराचे बाजूला उभा आहे. अशी खात्रीलायक माहिती मिळाल्यावरून पोलीस निरीक्षक बंटेवाड यांनी एक पथक सदर ठिकाणी पाठवून खात्री केली असता एक इसम तेथे मिळून आला. त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने जुबेर जावेद सय्यद, वय १८ वर्ष रा. हनुमान चौक, शाहूनगर, बीड असे सांगितले. पोलीस पथकाने त्याची अंगझाडती घेतली असता त्याचे कमरेला गावठी कट्टा मिळून आला. सदर इसमाविरुद्ध पोलीस स्टेशन शिवाजीनगर गुरन ३३०/२०२५ कलम ३/२५ शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला असून पुढील तपास पोलीस स्टेशन शिवाजीनगर व स्थानिक गुन्हे शाखा करत आहे.



सदरची कामगिरी ही मा.पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, मा.अपर पोलीस अधीक्षक श्री.सचिन पांडकर, पोलीस निरीक्षक श्री.शिवाजी बंटेवाड, यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, पोना/ बाळु सानप, पोकॉ/अर्जुन यादव, अश्विनकुमार सुरवसे, चालक/सिध्देश्वर मांजरे, नेम. स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांनी केलेली आहे.

## घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळु उपलब्ध करून द्या

### उपसरपंच अनिल राधे कांबळे यांचे तहसिलसमोर उपोषण

माजलगाव । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या वतीने घरकुल लाभार्थ्यांकरीता असलेली मोफत पाच ब्रास वाळु उपलब्ध करून द्यावी या मागणीसाठी ब्रम्हगावचे उपसरपंच अनिल राधे कांबळे यांच्या वतीने आज दि. १२ जुन २०२५ पासुन तहसिल कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्यात आले आहे.

दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, माजलगाव विधानसभा मतदारसंघातील अनेक घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध न झाल्यामुळे त्यांची बांधकामे रखडली असुन कामे पुर्ण होण्यास विलंब होत आहे. घरकुल योजनेअंतर्गत प्रत्येक लाभार्थ्यांसाठी असलेली मोफत पाच ब्रास वाळुचा पुरवठा आवश्यक असुन सद्यस्थितीत वाळू उपलब्ध करून द्यावी जेणेकरून लाभार्थ्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही. यासाठी शासनाने काळजी घेवुन सदरील मोफत वाळु उपलब्ध करून द्यावी या मागणीसाठी उपसरपंच अनिल राधे कांबळे यांच्या वतीने तहसिल कार्यालयासमोर उपोषण सुरू करण्यात आले आहे.




### उपोषणास अनेकांचा पाठींबा

उपसरपंच अनिल राधे कांबळे यांनी वाळु प्रश्नी सुरू केलेल्या उपोषणामुळे निश्चीतच लाभार्थ्यांना फायदा होणार आहे. त्यामुळे अनेकांनी कांबळे यांच्या उपोषणाला पाठींबा दिला असुन यामध्ये ३९ विवीध गावांचे लोकप्रतिनिधी असलेले सरपंच तसेच सामाजिक प्रश्नावर काम करणा–या २५ संघटनांनी पाठींबा दिला आहे.

## बीड शहरातील रस्त्याची जीओ कंपनीकडून तोडफोड : प्रकाश वडमारे

## जीओ कंपनी एखाद्याचा जीव गेल्यावर खड्डे बुजविणार का?



बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील मोंढा नाका ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते मोमीन पुरा मार्गे बार्शी नाका ते तेलगाव नाका, शासकीय दुध डेअरी ते सोमेश्वर मंदिरापासून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते नगर नाका या परिसरातील सिमेंट रस्त्याची तोडफोड करुन व पाईपलाईनची नासधुस करीत जीओ कंपनीकडून बीड नगर परिषद व राष्ट्रीय महामार्ग उपविभाग सा.बां.विभाग बीड यांच्याशी संगनमत करुन डिजीटल फायबर (ओएफसी) केबल टाकण्याचे काम जीओ कंपनीच्या गुत्तेदाराकडून नियम पायदळी तुडवून करण्यात येत आहे. जीओ कंपनीकडून केबल टाकण्याच्या नावाखाली गेल्या अनेक दिवसापासून सिमेंट रोडवर सहा फुटाचे खड्डे खोदून ठेवले आहेत.



खोदलेले खड्डे तात्काळ बुजविण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रकाश वडमारे यांनी केली आहे.

बीड शहरातील सर्व परिसरातील सिमेंट रस्ते खोदून ठेवल्यामुळे नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. जीओ कंपनीने केबल टाकण्यासाठी न.प.बीड व राष्ट्रीय महामार्ग उपविभाग बीड यांच्याकडून परवानगी घेतली आहे का? घेतली असेल तर खड्ड्याच्या बाजुला खड्डा खोदण्याचे फलक किंवा काम सुरु असल्याचे फलक लावण्यात आले नसल्यामुळे अपघात होवून जीवीत हाणी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. जीओ कंपनीकडून खड्डे खोदून ठेवल्यामुळे पावसाचे पाणी खड्ड्यात साचल्यामुळे अनेक वाहने खड्ड्यात पडून सर्व सामान्य नागरीक जखमी होतांना दिसून येत आहेत. बीड शहरातील खड्डे जीओ कंपनी एखाद्या नागरीकाचा जीव गेल्यावर बुजविणार आहे का? जीओ कंपनीने खोदलेला रस्ता तात्काळ दुरुस्त करुन घ्यावा नसता दुरसंचार विभाग भारत सरकार तसेच जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे तक्रार करण्यात येईल अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते प्रकाश वडमारे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

## पेठ बीड पो.स्टे. ने केलेली एमपीडीए कारवाईवर आईचा आक्रोश

बीड । प्रतिनिधी

दि. १२ जून २०२५ – आपल्या मुलावर एमपीडीए (गुन्हेगारी प्रवृत्ती रोखण्यासाठीचा कायदा) अंतर्गत अन्यायकारक कारवाई झाल्याचा आरोप करत सौ. जैनब बी शेख चांद यांनी पोलीस अधीक्षक, बीड यांच्याकडे लेखी अर्ज सादर केला आहे. त्यांनी या कारवाईची सखोल चौकशी करून अहवाल २० जून २०२५ पर्यंत सादर करण्याची मागणी केली आहे.

सौ. जैनब यांचा दावा आहे की, त्यांचा मुलगा शेख नवीद शेख चांद याच्यावर लावलेले गुन्हे हे खोटे असून एका स्थानिक महिलेच्या रागातून प्रेरित आहेत. त्या महिने खोटे गुन्हे दाखल करून पोलीस अधिकाऱ्यांशी संगनमत करत चझ्रऊ-अंतर्गत ही कारवाई घडवून आणल्याचा आरोप त्यांनी केला आहे. त्यांनी हे देखील नमूद केले की, पोलीस निरीक्षक व पोलीस कॉन्स्टेबल यांनी या प्रकरणात पक्षपात करत आर्थिक देवाणघेवाणीतून ही कृती केली असून,सौ. जैनब यांनी पुढील मागण्या केल्या आहेत.

संबंधित व्यक्तींच्या कॉल व व्हॉट्सप रेकॉर्डची चौकशी, पो.स्टे. पेठ बीड येथील उउढव फुटेज तपासणे, चझ्रऊ- कारवाईची स्वतंत्र चौकशी समितीकडून तपासणी, चौकशी अहवाल दिनांक २३ जून २०२५ पूर्वी लेखी स्वरूपात सादर करावा. आपल्या अर्जाच्या प्रत त्यांनी औरंगाबादच्या पोलीस आयुक्त व विशेष पोलीस महानिरीक्षक यांनाही पाठवल्या आहेत. कायदा हा गुन्हेगाराला शिक्षा देण्यासाठी असतो, निष्पापाला उध्वस्त करण्यासाठी नाही, अशा शब्दांत त्यांनी आपल्या मुलासाठी न्यायाची याचना केली आहे. चौकशी न झाल्यास संबंधित पोलीस अधिकाऱ्यांविरोधात न्यायालयात जाण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

